नामको बँक
(मल्टि-स्टेट शेडयुल्ड बँक)

*Namco Bank*
*(Multi-State Scheduled Bank)*

# दि नासिक मर्चन्टस् को—ऑपरेटिव्ह बँक लि.,नाशिक
( मल्टी स्टेट शेडयुल्ड बँक )
प्रशासकीय कार्यालय: अे—१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक,
नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक — ४२२ ००७
**PH. 0253-2308200 to 206 E-mail : ceo@namcobank.in Web Site : www.namcobank.in**

---

## विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस

स.न.वि.वि.

बँकेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक ३० जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजतां बँकेचे अध्यक्ष, श्री विजय राजाराम साने यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांकरीता व्हिडीओ कॉन्फरंन्सिग (VC) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) व्दारे आयोजित केली आहे. सदर सभा यंदाच्या कोव्हीड—१९ साथीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करण्याकरीता व केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांच्या दि.२५.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे बँकेच्या प्रशासकीय कार्यालय, सातपूर, नाशिक हे सभास्थान मानण्यात येईल. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.

## !! सभेपुढील विषय !!

**१.नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नेमणूकीसाठी मंजुरी मिळणेबाबत.**

**मा.संचालक मंडळाच्या आदेशावरुन**

**नाशिक** **दीपक ठाकूर**
**दिनांक : ३१ डिसेंबर २०२०** **मुख्य कार्यकारी अधिकारी**

<u>टिप :—</u>
सभेच्या नियोजीत वेळी गणपूर्ती न झाल्यास सभा स्थगित करून तीच सभा त्याच दिवशी अर्धातासानंतर सुरू होईल व त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही. सभेच्या ठरलेल्या वेळेस जेवढे सभासद बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर जाऊन सभेस उपस्थित राहतील, त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजतांना त्यावेळी ग्राहय धरली जाईल. तसेच काही अनपेक्षित परिस्थितीत उदा: तांत्रिक कारणांमुळे सदर विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रृटींचे निराकरण झाल्यानंतर त्यांच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल याची सभासदांनी नोंद घ्यावी.

ज्या सभासदांना काही माहिती हवी असल्यास त्यांनी त्याबाबत दि. १५ जानेवारी २०२१ पर्यंत कामकाजाच्या वेळेत, नोंदणीकृत कार्यालयात लिखीत स्वरूपात कळवावे. अथवा member@namcobank.in या मेल आयडीवर सभासद क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करून पाठवावे. जेणेकरून माहिती देता येईल.

## <u>विशेष सुचना</u>

१. या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर दि.२७.०१.२०२१ रोजी एसएमएस व्दारे लॉगईन आय.डी. व पासवर्ड पाठविण्यात येईल.
२. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्ट फोन या व्दारे सभासद, हया विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.
३. केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांच्या दिनांक २५.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सुचनांनुसार हया विशेष सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया दि.३०.०१.२०२१ रोजी ०१ दिवस होईल.
i) दि.३०.०१.२०२१ रोजी सभेच्या निर्धारीत वेळेपूर्वी १० मिनिटे आधी म्हणजे सकाळी ११.०० च्या आधी, सभासदांनी लॉगईन करावे.
ii) दि.३०.०१.२०२१ रोजी सर्वप्रथम सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय सभेपुढे मांडण्यात येतील त्यानंतर म्हणजेच दुपारी २.०० नंतर ते सायंकाळी ५.०० या कालावधीत, विशेष सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आलेल्या ठरावांवर सभासदांनी त्याच लिंकवर/संकेतस्थळावर मतनोंदणी करावयाची आहे. ठराव मंजुरीबाबतचा निर्णय मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर त्याच लिंकवर/संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.
४. केंद्रीय निबंधक यांनी दि.२५.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकात, ऑनलाईन पध्दतीने विशेष सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सुचना केली आहे. त्याअनुषंगाने, बँकेने मे.टॅनम कंन्सल्टींग एल.एल.पी.यांची ऑनलाईन पध्दतीने विशेष सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी व विशेष सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणाऱ्या ठरावांवर ऑनलाईन पध्दतीने मतनोंदणीचे आयोजन करण्यासाठी नेमणूक केली आहे.
५. ज्या सभासदांनी, त्यांच्या मोबाईल क्र.साठी “DO NOT DISTURB (DND)” हा पर्याय निवडला असेल, अशा सभासदांना विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी लॉगइन आय.डी. आणि पासवर्डचा SMS मिळु शकणार नाही. अशा सभासदांनी, कृपया DND पर्याय रद्द/निष्क्रिय करावा.
६. सभासदांना लॉगईनबाबत काही तांत्रिक अडचणी आल्यास—techsupport@eagm.cloud—यामेल आय.डी.वर अथवा ९६१९२८०४५५ या दूरध्वनी क्रमांकावर सकाळी १०.०० ते सायं. ६.०० यावेळेत सभासदांच्या सोईसाठी बँकेने ही सुविधा एजन्सीमार्फत उपलब्ध करून दिली आहे. लॉगईन अथवा पासवर्डबाबत काही प्रश्न /अडचणी असतील, तरच त्या सोडविल्या जातील. सभासदांच्या इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील, तर त्या सोडविणे, शक्य होणार नाही. तसेच, सभासदांना बँके संदर्भात अथवा विषय पत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्याचे निराकरण, या एजन्सीमार्फत दिलेल्या क्रमांकावर व मेल आय.डी वर होणार नाही.